।। वंदे मातरम् ।।

# हिंदुमहासभा





**शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवूया !**
**स्वातंत्र्यवीर सावरकर प्रणित हिंदुत्वनिष्ठ महाराष्ट्र घडवुया !!**

मतदार हो,
सादर नमस्कार,

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नेतृत्व हिंदुमहासभेला लाभले. हिंदुमहासभेच्या व्यासपीठावरुन हिंदुत्वा चा महामंत्र या राष्ट्राला स्वातंत्र्यवीर सावरकरांनी दिला. 'काँग्रेस ला मत म्हणजे फाळणीला मत' हा सावरकरांनी दिलेला धोक्याचा अिशारा जनतेला कळला नाही. जनता गांधीजींच्या भूलथापांना बळी पडली आणि महाराष्ट्रासह देशात काँग्रेसने सहा दशकाहून अधिक काळ सत्ता भोगली. दुबळ्या काँग्रेस नेतृत्वामूळे पाक व चीनने भारतभूमीचे लचके तोडले. कणखर नेतृत्वाच्या अभावामूळे पाक-चीन संबंघात देशहितास अनुसरुन ठोस धोरण स्विकारले. गेले नाही त्यामूळे कश्मीर समस्या केवळ काश्मिर पूरती मर्यादीत न रहाता. संपूर्ण देशात आय.अेस.आय ने छुपे युद्ध पुकारले. या युद्धाचा बीमोड सत्ताधारी काँग्रेस करु शकली नाही. या छुप्या युद्धाचा तडाखा महाराष्ट्राला फार मोठ्या प्रमाणात बसला. संपूर्ण महाराष्ट्र दहशतीच्या छायेत चाचपडत आहे. सामान्य जनतेची सुरक्षितता धोक्यात आली आहे. राज्यात बॉम्बहल्ले करणाऱ्या धर्मांध अतिरेक्यांना अद्याप कठोर शासन झालेले नाही. अतिरेकी मोकाट सुटले आहेत. मुंबअीत सर्व नियम धाब्यावर बसवुन सभांमधुन देशविधातक भाषणे देणाऱ्या अल्पसंख्यांकाच्या नेत्यांना अटक करण्याची हिम्मत या काँग्रेस सरकारकडे नाही. तर अिशरत जहाँ या अतिरेकी महिले साठी गळा काढणारे नेते राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये आहेत. गांधीवादी समाजवाद स्विकारलेल्या भाजपाचीही अल्पसंख्यांकाबाबत ची भूमिका काँग्रेस सारखीच आहे. भाजपा जरी केन्द्रात सत्तेत असली तरी हिंदुत्व या विचाराला सत्तेत स्थान नाही. महाराष्ट्राच्या विधानसभेत हिंदुत्वाच्या विचारांना प्राधान्य मिळण्यासाठी हिंदुमहासभेच्या अुमेदवाराना निवडून द्या, असे आवाहन करत आहे.

गेली पंधरा वर्षे आघाडी सरकारने राज्यात आणि केंद्रात प्रचंड भ्रष्टाचार केला आहे. राज्यात जलसिंचन प्रकल्पातील तर केंद्रातील २ जी.-३ जी. व कोळसा खाण वाटप घोटाळ्यात काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या नावे अग्रेसर आहेत. आदर्श सोसायटी तर सर्व पक्षीय घोटाळा आहे. शेतकयांचे स्वामित्व हिरावून घेतले जात आहे. राज्यात कर्जदार शेतकरी आत्महत्या करत आहेत. पिडीत शेतकयांच्या कुटुंबाकडे नुकसान भरपाईची राशी पोचत नाही. राज्यात मोठ्या प्रमाणावर वीजेचा तुटवडा असल्याने अुद्योग धंदे बंद पडत आहेत. अुद्योजक महाराष्ट्राबाहेर जात आहेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप सह शिवसेना या

पक्षांनी निवडणुकीत विकास हा महत्वाचा मुद्दा बनवला आहे. परंतु ते राज्यातील मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष करत आहेत. विकासाच्या गप्पा फसव्या आहेत. विकासकामामागील हेतु प्रामाणिक नाहीत. विकास कामाच्या प्रकल्पांमध्ये मोठ्याप्रमाणावर भ्रष्टाचार होत आहेत. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटकेत असलेले शिवसेना नेते सुरेश जैन तुरुंगातुन निवडणुक लढवित आहेत. तर 'मंदिर वही बनाएंगे' हा नारा देवून कोट्यावधी रुपये जमा करुन ही भाजपाने श्री राम मंदिर बांधले नाही. केवळ सत्ता मिळवणे हे एकमेव ध्येय असल्याने आघाडी व महायुती संपुष्टात आली.

लोकसभा व विधानसभा निवडणुकामध्ये देशाच्या आणि राज्याच्या महत्वाच्या समस्यांवरील उपाययोजनांसंबंधातील धोरणांवर आणि महत्वपूर्ण विषयांवर मंथन घडवून जनमानसाचा कौल मतदानातुन घ्यावयास हवा. परंतु तसे होत नाही, कित्येक दशके चिघळलेल्या समस्या बासनात बांधुन, प्रस्थापित पक्ष आपल्यास सोयीस्कर विषयावर वातावरण निर्मिती करुन मतदारांना मतदानास प्रवृत्त करतात. त्यामुळे समस्या चिघळतात. महाराष्ट्रातील गटबंधने तत्वावर आधारित नसल्याने देशात अग्रेसर असलेला महाराष्ट्र पिछाडीवर पडला आहे. पक्षाने आपल्या नितीमध्ये बदल न करणे अपेक्षित असते. याच सूत्रानुसार हिंदुमहासभेने हिंदुत्व या तत्वाची कास सोडलेली नाही. देशात आणि महाराष्ट्रात अल्पसंख्यांकांच्या मतांवर केन्द्रित झालेले राजकारण संपुष्टात आणण्याची आवश्यकता आहे. आणि ती ताकद हिंदुत्वामध्ये आहे. हिंदुत्व प्रबळ करण्यासाठी हिंदुमहासभेचा हिंदुत्वनिष्ठ उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा.

आपला नम्र,
अनुप केणी
प्रदेश अध्यक्ष

## या निवडणुकीतील हिंदुमहासभेचे धोरण

* धर्मावर आधारीत अल्पसंख्यांकाच्या आणि जातीवादावर आधारीत आरक्षणाला कठोर विरोध.
* मंत्रालयातील अल्पसंख्यांक विभाग संपुष्टात आणणे.
* अल्पसंख्यांकाच्या अनुदानास प्रतिबंध घालणे.
* महाराष्ट्रातील जनतेस सुरक्षेची हमी.
* भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्र राज्य.
* अुत्पादनशील अुद्योगास प्राथमिकता.
* **A.I.M.I.M.** सारख्या धर्मांध पक्षांना महाराष्ट्रात प्रतिबंध.
* लोकसंख्येवरील नियंत्रणासाठी सर्व समाजघटकांना आवश्यक ते नियम लागू करणे.
* सोयी-सुविधा आणि सवलतीसाठी दुर्बल आर्थिक स्थिती हा निकष असावा.
* महाराष्ट्रात स्वातंत्र्यवीर सावरकर प्रणित हिंदुत्ववाद प्रबळ करणे.

## हिंदुमहासभेच्या अुमेदवारांना विजयी करा !

निवडणुक चिन्ह
नारळ

सावंतवाडी विधानसभा मतदार संघाचे अुमेदवार
मतदान दिनांक : १५/१०/२०१४